# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान**

**" हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना"**

**कंत्राटी पदभरती सुधारित जाहीरात**

---

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना करिता खालील तक्त्यांत दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी पद्धतीने करार तत्त्वावर रिक्त पदांकरिता दिनांक १२/०९/२०२४ ते दिनांक २३/०९/२०२४ रोजीपर्यंत गुगलफॉर्म द्वारे अर्ज मागविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने दिनांक १२/०९/२०२४ रोजी जाहिरात www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु अटी शर्ती मध्ये काही सुधारित बदल असल्याने सुधारित जाहिरात www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**१५ वा वित्त आयोग अंतर्गत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथील रिक्त पदांचा तपशील (वेळ दुपारी २.०० ते रात्री १०.०० वाजेपर्यंत)**

| अक्र | पदाचे नाव | रिक्त पदांची संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन | नियुक्ती | जातीचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | १३ | MBBS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य<br>BAMS MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | ६००००/-<br>Rs 25000/fixed Salary & Rs 15000/- Performance Based Incentive | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | अजा-२, अज-१, विजाअ-१, भजब-१, इमाव-३, साशैमाव-२, ईडब्ल्यूएस-१, खुला-२ |
| २ | स्टाफ नर्स (स्त्री) | ११ | B.sc Nursing तसेच MNC कडील नोंदणी अनिवार्य | २००००/ | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | अज-१, विजाअ-१, भजब-१, इमाव-३, साशैमाव-१, ईडब्ल्यूएस-१, खुला-३ |
| ३ | स्टाफ नर्स (पुरुष) | ०१ | B.sc Nursing तसेच MNC कडील नोंदणी अनिवार्य | २००००/- | | खुला-१ |
| ४ | बहुउद्देशिय कर्मचारी (MPW) (पुरुष) | १५ | 12th Pass in Science AND Paramedical Basic training Course OR Sanitary Inspector Course (Government Recognized Institute) | १८०००/- | हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना | अजा-२, अज-१, विजाअ-१, भजब-१, इमाव-३, साशैमाव-२, ईडब्ल्यूएस-१, खुला-४ |

Scanned with CamScanner

**अर्ज भरण्याबाबतच्या सुचना**

१. सर्व उमेदवारांनी खालील नमूद गुगल लिंक वर ऑनलाईन गुगल फार्म मध्येच अर्ज विहित कालावधीत भरणे आवश्यक आहे अर्ज भरण्यासाठी गुगल फॉर्म लिंक https://docs.google.com/forms/d/e/१FAIpQLScjIOVme१Uptexe४CzdNVhg६०C२il१zjRA३MHkpvhbutLGZw/viewform?vc=०&c=०&w=१&flr=०&pli=१

२. उमेदवारांने स्वत:चे पूर्ण नाव माध्यमिक शाळा प्रमाणपत्राप्रमाणे अचूकपणे नोंदवावे. अर्जासोबत माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाणपत्राची प्रत जोडावी.

३. माध्यमिक शालांत परीक्षा प्रमाण पत्रामध्ये नमूद जन्म तारीखच अर्जात नमूद करावी.

४.अंतिम वर्षाचे CGPA/SGPA गुण ग्राह्य धरण्यात येणार नाही.

५. जाहिरात प्रसिद्ध केलेल्या दिनांका पर्यंत असणारे वय दिवस महिने व वर्ष अचूक नमुद करावे.

६.अर्जात उमेदवारांचे लिंग या बाबतची माहिती नमूद करावी.

७. अर्ज करीत असणारी अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette) अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८. अर्जात दिलेल्या प्रत्येक मुद्याची माहिती अचुक भरावी. एकदा भरलेली माहिती अंतिम समजण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

९. गुगल फॉर्म परीपुर्ण भरल्यावर त्याची प्रिंट काढावी.

१०. **वैद्यकिय अधिकारी** यांनी पुर्ण भरलेल्या गुगल फॉर्मची स्वसाक्षांकित प्रत व सर्व मुळ कागदपत्रे, उल्हासनगर महानगरपालिका, वॉर रूम, दुसरा मजला येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) मुलाखतीच्या वेळेस सादर करावे. मुलाखतीची दिनांक व वेळ दुरध्वनी अथवा मेलद्वारे कळविण्यात येईल.

११. **जीएनएम, बहुउद्देशिय कर्मचारी (MPW)** यांनी गुगल फॉर्म दिनांक २३/०९/२०२४ रोजीपर्यंत भरावे. तसेच अर्जाच्या छाननी/पडताळणी करिता उमेदवाराने गुगल फॉर्मची स्वसाक्षांकित (Self Attested) व सर्व छायांकित (Xerox) शैक्षणिक प्रमाणपत्राची प्रत, उल्हासनगर महानगरपालिका, वॉर रूम, दुसरा मजला येथे (शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) दिनांक ३०/०९/२०२४ रोजीपर्यंत प्रत्यक्षात (By Hand), अथवा टपालाने/कुरीयरने सादर करावे.

१२. जीएनएम, बहुउद्देशिय कर्मचारी (MPW) या उमेदवारांची निवड गुणांकन पद्दतीने होत असल्याने नियुक्ती दरम्यान मुळ शैक्षणिक प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.

१३. दिलेल्या मुदतीनंतर सादर करण्यात येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपालाने/कुरीयरने सादर केलेले अर्ज विहित कालावधीत या कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. उशीरा प्राप्त अर्जाची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१४. अर्जदाराने भरलेल्या गुगलफॉर्मची प्रत या कार्यालयास सादर न केल्यास असा अर्ज अपूर्ण समजण्यात येऊन तो रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अटी व शर्ती:-**

१) १५ वा वित्त आयोग अंतर्गत " हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" येथील वैदयकिय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारकांच्या नियुक्तिला प्राधान्य देण्यासाठी केंद्र शासनाने सुचविले आहे. त्यानुसार " हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्रातील वैदयकिय अधिकारी पदाकरीता MBBS पदवीधारकांची नियुक्ति करणेकरीता प्राधान्य देण्यात येईल. परंतु अनेक प्रयत्न करुनही MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध न झाल्यास, १५ वा वित्त आयोग अंतर्गत " हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" केंद्राकरीता वैदयकिय अधिकारी म्हणुन MBBS पदवीधारक उमेदवार उपलब्ध होईपर्यंत

Scanned with CamScanner

अथवा ६ महिन्याकरीता BAMS पदवीधारक उमेदवारास वैदयकिय अधिकारी म्हणुन तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ति देण्यात येईल.

२) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन दि. २९-०६-२०२५ रोजी पर्यंतच्या कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. पुढील पुर्ननियुक्ती (11 महिने 29 दिवसाच्या कालावधीकरीता) आपल्या कामगिरी मुल्यांकनावर आधारीत असेल. शासनाने सदर पदे नामंजुर केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा संपुष्टात येईल

३) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

४) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

५) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही. तसेच यापदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत. सदर पदावर कायमचा हक्क राहणार नाही तसेच या पदासाठी अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधि दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

६) जाहिरातीतील रिक्त पदाच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणांमध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्त तथा प्रशासक, उल्हासनगर महानगरपालिका यांनी राखुन ठवले आहेत.

७) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिला जाईल.

८) निवड यादीतील गुणक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रम पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवारांनी कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रदद करण्यात होईल.

९) जाहिरीतीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्गीय करीता 43 वर्षे राहील. NHM मध्ये कार्यरत असल्यास वयोमर्यादा हि ५ वर्ष शिथील राहील. वैद्यकीय अधिकारी (एम.बी.बी.एस.) यांची सेवा प्रवेश आणि सेवा समाप्तीची वयोमर्यादा 70 वर्ष राहील. 60 वर्षावरील अर्जदारांकरीता जिल्हा शल्य चिकित्सक प्रमाणित शारिरीक योग्यता: (Physical Fitness) चे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. वय वर्ष 60 नंतर प्रत्येक वर्षी जिल्हाशल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतरच नियुक्ती आदेश देण्यात येईल.

१०) वैदयकिय अधिकारी या पदाकरीता शासकिय सेवेतुन सेवानिवृत्तस्वेच्छा सेवानिवृत्ती वैदयकिय अधिकारी या पदाकरीता अर्ज करीत असल्यास शासकिय सेवेत रुजु झालेला दिनांक, कार्यकाळ, पदनाम व निवृत्त झालेले वर्ष, सेवा निवृत्तीच्या दिनांकास मिळालेलं अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) याबाबतची संपूर्ण माहिती अर्जामध्ये नमुद करावी.

Scanned with CamScanner

११) शासकीय कर्मचारी यांच्या पुर्वीच्या शासकीय कर्मचारी कार्यकाळात कुठल्याही प्रकारचे गंभीर गुन्हयाची नोंद नसावी किंवा झालेली नसावी. सेवा निवृत्त यांचे निवड झाल्यास सदर पदांकरीता मानधन राज्यस्तरीय विविध मार्गदर्शक सुचनानुसार मोजमाप करून अदा करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१२) निवड झालेल्या उमेदवारांनी नियुक्तीच्या वेळेस फौजदारी गुन्हा दाखल नसलेबाबतचे हमीपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

.१३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१४) उपरोक्त सर्व पदांकरीता तत्सम कौंसिल रजिष्ट्रेशनचे प्रमाणपत्र, नुतनीकरण व वैधता तारीख दर्शविणारे आय.डी. जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारास अपात्र ठरविले जाईल.

१५) भरती प्रक्रियेचे संपूर्ण अधिकार, पदे कमी जास्त करणे भरती प्रक्रिया रद्द करणे व अटी शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे इत्यादी सर्व अधिकार असून निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेले आहेत. याबाबत कोणालाही दावा करता येणार नाही .

१६) इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्राच्या छायांकित सत्य प्रतीसह उदा. वयाचा पुरावा, पदवी /पदविका प्रमाणपत्र (सर्व वर्षाचे प्रमाणपत्र) गुणपत्रिका, शासकीय/ निमशासकीय/ खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र कागदपत्र कार्यालय प्रमुखाच्या स्वाक्षरी तथा नाव व मोबाईल क्र. सह जोडण्यात यावे. अनुभव संबंधित कामाचा असावा, जात/ वैधता प्रमाणपत्र इ. छायांकित प्रतीसह दिनांक १२/०९/२०२४ ते दिनांक २३/०९/२०२४ (शासकिय सुट्टया वगळता) या कालावधीत सकाळी ११.०० ते सायं ५ .००वाजेपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर येथे स्वीकारले जातील.

१७) सदर पदभरती करीता अर्ज छाननी, निवड यादी प्रसिद्ध करणे, हरकती/आक्षेप प्राप्त करून घेणे व त्या निकाली काढणे आदि रितसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडील प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ति आदेश देणे इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी www.umc.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेद्वारांना वेयक्तीक स्वरूपात कळविण्यात येणार नाही . उमेदवारांनी वैयक्तिक स्वरुपात या कार्यालयात चौकशी करण्यास येऊ नये

१८) सदर अर्ज स्विकारला म्हणजे नोकरीसाठी निवड झाली असे नाही. सदर निवड प्रक्रिया हि नव्याने सुरु होत असलेल्या १५ वा वित्त आयोग अंतर्गत हिंदुन्हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे असुन केंद्रांची डागडुजी देखभाल दुरुस्ती बांधकाम विभागा मार्फत पूर्ण होऊन वैद्यकिय आरोग्य विभागास हस्तांतरण झाल्यानंतर निवड यादीतील गुणक्रमाने नियुक्ती आदेश देण्यात येतील.

Scanned with CamScanner

१९) सदर निवड प्रक्रिया पूर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

२०) लहान कुटुंबाची अट दोनपेक्षा अधिक हयात मुले असणारे उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या पदभरतीसाठी अर्ज करण्यास पात्र ठरणार नाहीत.

२१) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्याच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर ई-मेल आयडी अचूक नोंदवावा तसेच ते भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत व भरतीप्रक्रिया निकाल जाहिर झाल्याच्या दिनांकापासून ते १ वर्षापर्यंत सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

२२) बहुउद्देशीय कर्मचारी या पदाकरीता विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण केलेली आहेत आणि विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडून आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकीय व मुलभूत प्रशिक्षणअभ्यासक्रम किवां आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनटरी इन्स्पेक्टर) उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

२३) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.100/- बॉन्ड पेपरवर करारनामा पेपरवर पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

२४) १५ वा वित्त आयोग अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांना " हिंदुह्रदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" जसजसे कार्यान्वित होतील त्याप्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात येतील. नियुक्ति आदेश मिळाल्यापासून 7 दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षायादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

**२५) खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.**

१. पुर्ण माहिती भरलेला गुगल फॉर्म
२. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
३. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र Domicile Certificate
४. आरक्षणाच्या पदासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
५. शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
६. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
७. आधारकार्ड
८. अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
९. शासकीय/ निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव असलेस अनुभव प्रमाणपत्र.
१०. MS-CIT प्रमाणपत्र
११. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
१२. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

Scanned with CamScanner

## पात्र उमेदवारांमधून निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवण्यात येईल.

१. **थेट मुलाखतीसाठी गुणांकन पद्धती :-** पूर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS) व (BAMS) ही पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

| अ.क्र | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| १ | Subject Knolwledge | १० |
| २ | Research & Academic Knowledge | १० |
| ३ | Leadership Quality | १० |
| ४ | Administrative Ablities | १० |
| ५ | Experience | १० |
| | a) For Govt. Experience | 2 marks for one year |
| | b) For private Experience | 1 marks for one year |
| | एकुण गुण | ५० |

२. **गुणांकन पद्धती** :- जीएनएम, एमपीडब्ल्यु पदांकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

| अ.क्र | विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००= ३०) | ५० |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २०प्रमाणे Proportion काढावे. (उदा. १. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेद्वाराने अर्ज केला असल्यास उमेद्वारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्यास २०% प्रमाणे Proportion = ६०*२०/१००=१२ गुण) | २० |
| ३ | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण | ३० गुण |
| | | | एकुण १०० गुण |

(डॉ. मोहिनी धर्मा)
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**उल्हासनगर महानगरपालिका**

Scanned with CamScanner

**प्रतिज्ञापत्र**
**(लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र)**
**नमुना अ**

मी श्री/श्रीम ------------------,---------------------------श्री.------------------------------------------------
---यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय ------------वर्ष राहणार---------------------------याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/करते की,

१) मी ----------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे.

२) आज रोजी मला ----------------------(संख्या) इतकी मुल हयात आहे. यापैकी दिनांक ३१ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या----------- आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर ३१ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल.

ठिकाण :-

दिनांक :-

सही--------------------------

( )

Scanned with CamScanner

# फौजदारी गुन्हा दाखल नसलेबाबतचे हमीपत्र

मी श्री/श्रीम/कुमारी ------------------------------------ वय ------------वर्ष सध्या राहणार-------------

----असे लिहून देते/देतो की, या पत्यावर ------------वर्षांपासून आजपर्यंत राहत आहे.

तरी मी वास्तव्य करीत असलेल्या वरील नमूद कालावधीत माझ्याविरूद्ध मी राहत असलेल्या कार्यक्षेत्रातील पोलीस स्टेशनच्या अभिलेखावर काही एक दखलपात्र गुन्हा अथवा आक्षेपार्ह नोंदी नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

सही-------------------------

(          )

Scanned with CamScanner